


संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा




रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. ०९.०४.२०२६ | अंक नं. ००८ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020










# सराफ बाजारातील अतिक्रमणांवर कारवाई करावी अन्यथा व्यापारी 'उच्च न्यायालयात' दाद मागणार

## राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्याकडे तक्रार, महापालिका आयुक्तांविरोधात शिस्तभंगाच्या कारवाईची मागणी

नगर - शहरातील सराफ बाजार व गंज बाजार परिसरात गेल्या १० ते १५ वर्षांपासून अनेक जणांनी संघटित स्वरुपात सार्वजनिक रस्त्यांवर अतिक्रमणे केलेली आहेत. त्यामुळे संपूर्ण बाजारपेठेचे अस्तित्व धोक्यात आले आहे. या अतिक्रमणामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत असून रुग्णवाहिका व अग्निशमन दलासारख्या आपत्कालीन सेवांनाही येथे पोहोचण्यास मार्ग मिळत नाही, अशी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. या अतिक्रमणांबाबत वारंवार तक्रार करुनही महापालिका काहीही कारवाई करीत नाही. त्यामुळे आयुक्तांवर शिस्तभंगाची कारवाई करावी. तसेच या अतिक्रमणधारकांवर एमपीडीए अंतर्गत कारवाई करावी. अन्यथा न्यायालयात जाण्याचा इशारा सराफ सुवर्णकार व्यापारी संघटनेने दिला आहे.

सराफ सुवर्णकार व्यापारी संघटनेचे अध्यक्ष प्रकाश लोळगे यांनी ८ एप्रिल रोजी नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ व नगरविकास विभागाचे प्रधान सचिव यांची भेट घेवून शहरातील सराफ बाजार व गंज बाजार परिसरात वाढलेल्या अतिक्रमणाविरोधात तसेच महापालिका आयुक्तांविरोधात तक्रार केली. तसेच विविध मागण्यांचे निवेदन दिले. या निवेदनात म्हटले आहे, २९ जुलै २०२५ रोजी सादर केलेल्या निवेदनावर अद्याप कोणतीही ठोस कारवाई न झाल्यामुळे व्यापारी वर्ग संतप्त झाला आहे. सराफ बाजार व गंज बाजार प्रवेशद्वारावरील बेकायदेशीर अतिक्रमण, अनधिकृत वीज वापर तसेच संघटित टोळ्यांमार्फत कायदा व सुव्यवस्थेचा भंग होत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. मागील १० ते १५ वर्षांपासून काही विक्रेते व व्यावसायिक संघटित स्वरूपात सार्वजनिक रस्त्यावर अतिक्रमण करत

(पुढील मजकूर व छायाचित्र पान २ वर)















जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# नगरमध्ये धार्मिक कार्यक्रमातील गर्दीत महिलेच्या मंगळसूत्राची चोरी

नगर - शहरातील गजबजलेल्या न्यू टिळक रोडवरील नंदनवन लॉन येथे एका धार्मिक कार्यक्रमादरम्यान वृद्ध महिलेच्या गळ्यातील सोन्याचे दागिने चोरीला गेल्याची घटना ८ एप्रिल रोजी सायंकाळी ६.१५ ते ६.४० या कालावधीत घडली आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मंगला रामदास गायकवाड (वय ६१, रा. दिल्लीगेट परिसर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी या नंदनवन लॉन येथे एका धार्मिक कार्यक्रमासाठी गेल्या होत्या. सायंकाळी आरती आटोपल्यानंतर महाराजांच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. याच गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने मंगला गायकवाड यांच्या गळ्यातील १ लाख २० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र अत्यंत शिताफीने ओरबाडून नेले. सुमारे २१ ग्रॅम वजनाचे हे दागिने चोरीला गेल्याचे लक्षात येताच परिसरात एकच खळबळ उडाली.

या घटनेनंतर गायकवाड यांनी तातडीने कोतवाली पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. पोलिसांनी याप्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) नुसार चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक प्रवीण पाटील आणि शीतल मुगडे या घटनेचा अधिक तपास करत आहेत. पोलीस परिसरातील सीसीटीव्ही चित्रीकरणाच्या सहाय्याने चोरट्याचा माग काढत आहेत. नागरिकांनी गर्दीच्या ठिकाणी दागिन्यांची काळजी घ्यावी, असे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.




महापालिका अतिक्रमण विभाग आणि शहर वाहतूक शाखा यांनी संयुक्त मोहिम राबवत कापड बाजार, मोची गल्ली, गंज बाजार या परिसरामध्ये रस्त्यावर अतिक्रमण मांडून व्यवसाय करणाऱ्यांवर कारवाई केली. शेजारील छायाचित्रात बेशिस्त दुचाकी पार्किंग तसेच नियमबाह्य नंबर प्लेट असलेल्या वाहनांवर शहर वाहतूक शाखेने कारवाई केली. (छाया : धनेश कटारिया)

# शहर वाहतूक शाखा व मनपाने हटविली कापड बाजार परिसरातील २० अतिक्रमणे

### बेशिस्त ३३ वाहनांना ठोठावला दंड

नगर - शहरातील वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या अतिक्रमणांविरोधात अहिल्यानगर शहर वाहतूक शाखा व महापालिका अतिक्रमण पथकाने कापड बाजार परिसरात संयुक्त कारवाई मोहीम राबवली. या मोहिमेत २० दुकानदार व हातगाडी चालकांवर कारवाई करण्यात आली असून ३३ वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

८ एप्रिल रोजी सायंकाळी एम. जी. रोडवरील कापड बाजार परिसरातील धरती चौक, शहाजी चौक, महावीर कॉर्नर, सर्जेपुरा, तेलीखुंट चौक व नवीपेठ या भागांत रस्त्यावर साहित्य मांडून विक्री करणारे दुकानदार, तात्पुरते स्टॉलधारक आणि हातगाडी चालक यांच्यावर ही कारवाई करण्यात आली. या अतिक्रमणामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असल्याची तक्रार होती.

या कारवाईपूर्वी ६ एपिल रोजी ३८ जणांना नोटीस देऊन अतिक्रमण काढून टाकण्याच्या सूचना करण्यात आल्या होत्या. मात्र काही दुकानदारांनी सूचनांकडे दुर्लक्ष करून रस्त्यावरच दुकाणातील साहित्य ठेवून विक्री सुरू ठेवली. त्यामुळे महापालिका व शहर वाहतूक शाखेच्या संयुक्त पथकाने ३ हातगाड्या, ५ टेबल, ३ जाहिरात फलक, ५ स्टूल, ३ खुर्च्या व ५ लोखंडी स्टॉल जप्त केले. तसेच ४ जणांना न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने प्रत्येकी १ हजार रुपये प्रमाणे एकूण ४ हजार रुपयांचा दंड वसूल केला. सार्वजनिक रहदारीस अडथळा निर्माण होईल अशा पद्धतीने रस्त्यावर उभ्या केलेल्या एकूण ३३ वाहनांवर मोटार वाहन कायद्यान्वये दंडात्मक कारवाई करण्यात आली. तसेच ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांच्या आदेशान्वये करण्यात आली. शहर वाहतूक शाखेचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शामुवेल गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक मन्सुर सय्यद, सहाय्यक फौजदार रामराव शिरसाठ, कोडम, पोलीस हवालदार विष्णु खेडकर, पोलीस कॉन्स्टेबल बाप्पु उंडे, राठोड, शेटे तसेच महानगरपालिका अतिक्रमण विभागाचे प्रमुख आदित्य बल्लाळ, नितीन इंगळे व अतिक्रमण निर्मूलन विभागाचे कर्मचारी आणि वॉर्डन यांच्या संयुक्त सहभागातून ही कारवाई पार पडली.

दरम्यान, नागरिकांनी सार्वजनिक रस्त्यांवर जाहिरात फलक, दुकाणातील विक्रीचे साहित्य, पुतळे, हातगाड्या इत्यादी लावून वाहतुकीस अडथळा निर्माण करू नये व प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# राज्यातील सरकारी कर्मचारी, शिक्षकांचे २१ एप्रिल पासून 'बेमुदत संप' आंदोलन

### तात्काळ तोडगा काढण्याची मागणी, जिल्ह्यात तालुके निहाय दौरे सुरु

नगर - अहिल्यानगर जिल्हा राज्य सरकारी, निमसरकारी कर्मचारी, मुख्याध्यापक व शिक्षक संघटना समन्वय समितीच्या वतीने राज्यातील सरकारी कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी २१ एप्रिल पासून बेमुदत संप आंदोलन छेडण्याचा निर्धार केला आहे. सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना तात्काळ लागू करावी तसेच विविध प्रलंबित मागण्यांवर ठोस निर्णय घ्यावा, या प्रमुख मागण्यांसाठी हा संप पुकारण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर तालुकानिहाय दौरे सुरु करण्यात आले असून, हा संप यशस्वी करण्याचे आवाहन समन्वय समितीचे निमंत्रक रावसाहेब निमसे व कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष सुभाष तळेकर यांनी केले आहे.

समन्वय समितीच्या म्हणण्यानुसार, राज्य शासनाने पूर्वीच्या आंदोलनानंतर जुन्या पेन्शनसदृश आर्थिक व सामाजिक सुरक्षा देण्याचे धोरण तत्त्वतः मान्य केले होते. तसेच यासंदर्भात समिती स्थापन करून शिफारशीही स्वीकारण्यात आल्या. २० सप्टेंबर २०२४ रोजी सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू करण्याचा शासन निर्णय झाला असला तरी प्रत्यक्ष अंमलबजावणी अद्याप झालेली नाही. परिणामी, १ मार्च २०२४ पासून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना पेन्शन मिळत नसल्याने आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

राज्यात सध्या एनपीएस, आरएनपीएस व केंद्राची यूपीएस योजना या पर्यायांचा विचार सुरू आहे. मात्र, एनपीएस योजना कर्मचाऱ्यांसाठी अपुरी असल्याचे मत, केंद्रातील यूपीएस योजना अनेक कर्मचाऱ्यांनी नाकारल्याचा उल्लेख, आरएनपीएस योजना अधिक सुरक्षित व फायदेशीर असल्याचा दावा आहे. आरएनपीएस अंतर्गत कर्मचाऱ्यांचे १०% व शासनाचे १४% (पुढे वाढून सुमारे १८.५%) योगदान जमा होऊन निवृत्तीनंतर शेवटच्या वेतनाच्या ५०% पर्यंत पेन्शन मिळण्याची हमी दिली जाते. त्यामुळे ही योजना कर्मचाऱ्यांसाठी अधिक सुरक्षित मानली जात आहे.

समितीने सांगितले की, गेल्या १५ महिन्यांत सात वेळा आंदोलन करूनही शासनाने ठोस निर्णय घेतलेला नाही. मुख्यमंत्री स्तरावर नियमित चर्चा यंत्रणा निर्माण करण्याची मागणीही करण्यात आली आहे, जेणेकरून लहान-मोठे प्रश्न तात्काळ सोडवता येतील.

संपाच्या माध्यमातून टिईटी परीक्षा व सेवांतर्गत प्रगती योजना अंमलबजावणी, नोव्हेंबर २००५ पूर्वीच्या अनुदानित शिक्षकांना जुनी पेन्शन, नगरपालिका व नगरपरिषदांच्या आकृतीबंधाचा प्रश्न, चतुर्थश्रेणी व वाहनचालक भरती प्रक्रिया सुरू करणे, लिपिक वर्गाच्या पदोन्नतीतील अडचणी दूर करणे, सर्व कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य विमा योजना लागू करणे, निवृत्ती वय ६० वर्षे करण्याची मागणी, कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवांचे नियमितीकरण या प्रश्नाबाबत शासनाचे लक्ष वेधले जाणार आहे

या संपाच्या पार्श्वभूमीवर समन्वय समितीचे तालुकानिहाय दौरे सुरू आहेत. कोपरगाव व राहाता येथे झालेल्या बैठकींना प्रतिसाद मिळाला असून पुढील दौऱ्यांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. ९ एप्रिल संगमनेर, अकोला, १० एप्रिल श्रीरामपूर, राहुरी, १३ एप्रिल नेवासा, शेवगाव, पाथर्डी, १५ एप्रिल जामखेड, कर्जत, १६ एप्रिल पारनेर, श्रीगोंदा, १७ एप्रिल अहिल्यानगर, २० एप्रिल शहरातील सर्व कार्यालये येथे दौरे करुन बैठका घेतल्या जाणार आहे.

समितीने स्पष्ट केले की, हे आंदोलन केवळ आंदोलनासाठी नसून कर्मचाऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठीचा लढा आहे. शासनाने तात्काळ सकारात्मक निर्णय घेतला नाही तर २१ एप्रिलपासूनचा संप तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# नगरमध्ये भरदिवसा कारमधून सव्वा लाखाची रोकड लंपास

### सावेडी उपनगरातील घटना, २ अनोळखी चोरट्यांवर गुन्हा दाखल

नगर - सावेडी उपनगरातील मिस्किन मळा परिसरात असलेल्या पॅराडाईझ सोडा पॉईंटसमोरून चोरट्यांनी ७ एप्रिल रोजी दुपारी १२.१५ च्या सुमारास भरदिवसा धाडसी चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे. चारचाकी गाडीतून दोन अनोळखी इसमांनी १ लाख २५ हजार रुपयांची रोख रक्कम लंपास केली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत रोहन बाबासाहेब शिरसाठ (वय ३०, रा. शिरसाठ मळा, पाईपलाईन रोड) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी शिरसाठ हे ७ एप्रिल रोजी दुपारी सव्वाबाराच्या सुमारास मिस्किन मळा परिसरात गेले होते. त्यांनी आपली चारचाकी गाडी पॅराडाईझ सोडा पॉईंटसमोर उभी केली होती. गाडीच्या पुढच्या सीटच्या मध्ये त्यांनी पैशांची पिशवी ठेवली होती. हीच संधी साधून दोन अनोळखी चोरट्यांनी ती पिशवी चोरून नेली. पिशवीमध्ये विविध दरांच्या नोटा असलेली एकूण सव्वा लाखाची रोकड होती. चोरी झाल्याचे लक्षात येताच शिरसाठ यांनी तात्काळ पोलिसांशी संपर्क साधला. या घटनेची माहिती मिळताच तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ, सहाय्यक पोलीस निरीक्षक पूनम श्रीवास्तव आणि पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर यांनी घटनास्थळाची पाहणी केली.

या प्रकरणी तोफखाना पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ३०५ (ब) नुसार अज्ञात दोन आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस अंमलदार बारगजे आणि खंडागळे करत आहेत. पोलीस सीसीटीव्ही फुटेजच्या सहाय्याने आरोपींचा शोध घेत आहेत.

## अनिल घोडके यांचे अल्प आजाराने निधन



नगर - बोल्हेगाव येथील घुले कॉलेज समोरील श्रीराम कॉलनीतील रहिवासी अनिल विद्याधर घोडके (वय ६२) यांचे ९ एप्रिल रोजी रात्री १.३० वाजता अल्प आजाराने निधन झाले. त्यांचा दफनविधी बुऱ्हाणनगर येथील कब्रस्तानात करण्यात आला.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सुनीता घोडके यांचे ते पती तर अशितोष, सिमरन घोडके यांचे ते वडील होत.

## संदीप रंधवे यांचे अल्प आजाराने निधन



नगर - मुंढेकरवाडी (ता.श्रीगोंदा) येथील रहिवासी संदीप विलास रंधवे (वय ४५) यांचे ७ एप्रिल रोजी पहाटे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मुंढेकरवाडी स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, पत्नी, २ मुले, १ मुलगी, १ भाऊ, १ बहीण असा परिवार आहे.

मुंढेकरवाडी सोसायटीचे ते संचालक होत.

## शंकरराव येळवंडे यांचे अकस्मात निधन



आळंदी - येथील साई मंगल कार्यालयाचे संचालक उद्योजक शंकरराव रामभाऊ येळवंडे (वय ४५) यांचे अकस्मात निधन झाले.

त्यांच्या मागे आई, वडील, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, भाऊ, बहीण, चुलते, चुलत भाऊ असा परिवार आहे. आळंदी नगरपरिषद नगरसेविका कांचन येळवंडे यांची ते दीर, पुणे जिल्हा भाजपचे सरचिटणीस किरण येळवंडे, उद्योजक सचिन येळवंडे यांचे ते बंधू होते. त्यांच्या पार्थिवावर आळंदी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

## अशोक कदम यांचे अल्पशा आजाराने निधन



आळंदी - येथील आळंदी शहर शिवसेना (उबाठा गट) विभाग प्रमुख, आळंदी पंचक्रोशी रिक्षा संघटनेचे अध्यक्ष अशोक बबन कदम यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, भाऊ, बहीण, पुतणे असा परिवार आहे.

मरकळ येथील श्रीगुरुदेव दत्त प्रतिष्ठान पंचलिंग देवस्थान अध्यक्षा अरुणा उर्फ ताई माऊली महाराज लोखंडे, शिवसेना आळंदी देहू फाटा शाखा प्रमुख रोहिदास कदम यांचे ते बंधू होते. त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# 'सेनापती बापट' मल्टीस्टेट सोसायटीच्या अपहारात कर्जदाराला अटक

### आर्थिक गुन्हे शाखेची कारवाई, न्यायालयाने सुनावली ५ दिवस पोलिस कोठडी

नगर - पारनेर येथील सेनापती बापट मल्टीस्टेट को ऑप क्रेडीट सोसायटीच्या अपहार प्रकरणी येथील आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी एका कर्जदाराला अटक केली आहे. महेंद्र साईनाथ मंडलीक (वय ४४, रा. शिक्रापुर, ता. शिरूर, जि. पुणे) असे अटक केलेल्या कर्जदाराचे नाव आहे. न्यायालयाने त्याला पाच दिवस (१३ एप्रिलपर्यंत) पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

सुभाष अश्रुजी आंग्रे (वय ७५, रा. अळकुटी, ता. पारनेर) यांच्या फिर्यादीवरून पारनेर पोलीस ठाण्यात चेअरमन, मुख्य कार्यकारी अधिकारी व संचालक मंडळातील सदस्य यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता. संशयित आरोपींनी फिर्यादीसह इतर ठेवीदारांना जास्त व्याजदाराचे आमिष दाखवून ठेवी स्वीकारून सुमारे २ कोटी ५० लाख ३८ हजार ६१३ रूपयांचा अपहार करून फसवणूक केल्याचा आरोप करण्यात आला होता. दरम्यान, सदरचा गुन्हा पुढील तपासकामी आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास सहायक पोलीस निरीक्षक युवराज आठरे करीत आहेत. पोलिसांनी ठेवीदारांचे जबाब नोंदवून घेतले असून अपहाराची रक्कम सुमारे सहा कोटींवर पोहचली आहे. या गुन्ह्यात महेंद्र मंडलीक याचा सहभाग निष्पन्न झाला असून त्याला गुन्ह्यात संशयित आरोपी करून अटक करण्यात आली आहे.

दरम्यान, मंडलीक याने सेनापती बापट मल्टीस्टेट सोसायटीच्या संचालक मंडळाशी संगणमत करून सोसायटीच्या मालकीच्या सुपा एमआयडीसीतील प्लॅट व सुर्यतारा नावाची कंपनी विकत घेतल्याचे तसेच सदर खरेदीसाठी सेनापती बापट संस्थेतूनच कर्ज घेतले असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच त्याने सदर कर्जाची परतफेड न करता पुन्हा तीच मालमत्ता तारण देवून अॅचक्सीस बँकेकडून सात कोटी पेक्षा जास्त रकमेचे कर्ज घेतले असल्याचे निष्पन्न झाल्याने मंडलीक याला संशयित आरोपी करून अटक करण्यात आली आहे. त्याच्याकडे अधिक चौकशी करण्यात येत आहे. या गुन्ह्यात चेअरमन, मुख्य कार्यकारी अधिकारी व संचालक मंडळ संशयित आरोपी आहेत. मात्र, ज्या कर्जदारांनी कर्ज घेतले आहे व त्यांनी परतफेड केली नाही अशा कर्जदारांना या गुन्ह्यात संशयित आरोपी करण्यात येणार असल्याचे तपासी अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक युवराज आठरे यांनी सांगितले.

# सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी घरी आलेल्या कंपनीच्या कामगाराने चोरली सोन्याची अंगठी

### केडगाव उपनगरातील घटना, संशयित कामगारावर गुन्हा दाखल

नगर - घराच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसवून घेणे एका महिलेला महागात पडले आहे. कॅमेरे बसवण्याचे काम करणाऱ्या कामगारानेच घरातील टेबलवर ठेवलेली सोन्याची अंगठी चोरल्याची घटना केडगाव येथील शिवाजीनगर भागात घडली आहे. याप्रकरणी सुनंदा श्रीहरी अधापुरे यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

पोलिसांनी सतीश रेसवाल (पूर्ण नाव, पत्ता माहित नाही) या संशयित कामगारावर चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी या आपल्या मुलासह केडगाव परिसरात राहतात. घराच्या बाहेर सीसीटीव्ही बसवण्यासाठी त्यांनी एका कंपनीशी संपर्क साधला होता. त्यानुसार सतीश रेसवाल हा कामगार त्यांच्या घरी पाच दिवसांपासून काम करत होता. कामादरम्यान घरात धूळ उडत असल्याने फिर्यादी यांनी आपली सहा ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी हॉलमधील एका बरणीत काढून ठेवली होती.

काम आटोपून रेसवाल निघून गेल्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी फिर्यादी यांनी पाहिले असता, त्यांना बरणीतील अंगठी दिसून आली नाही. घरात इतर कोणत्याही व्यक्तीचे येणे-जाणे नसल्याने आणि संशयिताचा मोबाईल क्रमांकही बंद असल्याने त्यानेच ही चोरी केल्याची खात्री फिर्यादीला पटली. प्रकृती अस्वास्थ्यामुळे फिर्याद देण्यास विलंब झाला असून, पोलिसांनी १२ हजार रुपये किमतीची सोन्याची अंगठी चोरी प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सहाय्यक फौजदार गोविंद गोल्हार करत आहेत.

# सराफ बाजारातील अतिक्रमणांवर कारवाई करा

(पान १ वरुन)

असून त्यामुळे संपूर्ण बाजारपेठेचे अस्तित्व धोक्यात आले आहे. या अतिक्रमणामुळे नागरिकांच्या हालचालींना अडथळा निर्माण होत असून व्यापाऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे. तसेच रुग्णवाहिका व अग्निशमन दलासारख्या आपत्कालीन सेवांनाही अडथळे निर्माण होत असल्याने गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. प्रशासनाकडे ४८ तासांत विशेष मोहीम राबवून सर्व अतिक्रमणे हटविणे, संबंधितांवर गुन्हे दाखल करणे, अनधिकृत वीज जोडण्या तोडणे तसेच संबंधित टोळीवर एमपीडीए कायद्यानुसार कारवाई करणे आणि महानगरपालिका आयुक्तांविरोधात शिस्तभंगाची कारवाई करून चौकशी पूर्ण होईपर्यंत सक्तीच्या रजेवर पाठविण्याची मागणीही करण्यात आली आहे.



गंज बाजार येथील संघटित अतिक्रमणावर कारवाई करावी आणि अतिक्रमण कायमचे हटवावे या मागणीचे निवेदन सराफ बाजार संघटनेचे अध्यक्ष प्रकाश लोळगे यांनी नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांना दिले. (छाया : धनेश कटारिया)

पोलीस प्रशासनाला तात्काळ गुन्हे नोंदविणे, एमपीडीए प्रस्ताव सादर करणे आणि कायमस्वरूपी बंदोबस्त ठेवण्याचे निर्देश देण्यात यावेत, अशी मागणीही या निवेदनात करण्यात आली आहे.

दरम्यान, तात्काळ कारवाई न झाल्यास उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करून संबंधित अधिकाऱ्यांवर वैयक्तिक जबाबदारी निश्चित करण्यासोबतच न्यायालयीन अवमानाची कार्यवाही करण्याचा इशारा व्यापाऱ्यांनी दिला आहे.

# पोलिसांच्या निष्क्रियतेमुळे चोरटे मोकाट

### 'कोतवाली'चे पोलीस निरिक्षक संभाजी गायकवाड यांची तातडीने बदली करा

नगर - शहरातील कोतवाली पोलीस स्टेशन हद्दीतील सारसनगर, भवानीनगर, विनायकनगर, बुरुडगाव रोड परिसरामध्ये गेल्या महिन्यापासून रोज चोरीच्या घटना घडत आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र कोतवाली पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक संभाजी गायकवाड व कर्मचाऱ्यांच्या निष्क्रियतेमुळे चोरटे अजूनही मोकाट असल्याने चोरीच्या घटना थांबत नसल्याने पोलीस प्रशासन पूर्णपणे अपयशी ठरले आहे. त्यामुळे कोतवाली पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक संभाजी गायकवाड यांची तातडीने बदली करावी व त्याठिकाणी चांगल्या सक्षम अधिकाऱ्याची नियुक्ती करावी, या मागणीचे निवेदन प्रेरणा प्रतिष्ठानचे पदाधिकारी वैभव ढाकणे यांनी अप्पर पोलीस अधिक्षक वैभव कलुबर्मे यांना दिले.



कोतवाली पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक संभाजी गायकवाड यांची तातडीने बदली करावी, या मागणीचे निवेदन प्रेरणा प्रतिष्ठानच्यावतीने देण्यात आले.

यावेळी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, सारसनगर, भवानीनगर, विनायकनगर, बुरुडगाव रोड परिसरामध्ये वारंवार होणाऱ्या चाऱ्यांच्या घटनेबाबत आ.संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली प्रेरणा प्रतिष्ठानच्या वतीने कोतवाली पोलीस स्टेशन मध्ये अनेकदा निवेदने दिली आहेत. परंतु संभाजी गायकवाड यांच्या निष्क्रीयतेमुळे चोरट्यांना पकडले न गेल्याने चोऱ्यांच्या घटना थांबलेल्या नाहीत. त्यामुळे या भागात चो-या थांबवण्यासाठी संभाजी गायकवाड यांची तातडीने बदली करुन ठोस व शाश्वत उपाययोजना करुन या भागामध्ये रात्रीच्या पोलीस गस्तीत वाढ करून नागरीकांना दिलासा द्यावा. अद्याप एकही चोर पकडला न गेल्याने पोलीस प्रशासन जाणीवपुर्वक चोरट्यांना पाठीशी घालत असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली झाहे. सदर बाब पोलीस प्रशासनाच्या दृष्टीने अत्यंत गंभीर आहे. तरी सर्व बाबींचा विचार करुन चोऱ्यांच्या घटना थांबवण्यासाठी योग्य उपाय योजना कराव्या. अन्यथा नागरिकांसह जनआंदोलन करण्यात येईल. यावेळी मंगेश खताळ, मळू गाडळकर, अमित औसरकर व सनी कांबळे उपस्थित होते.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# वास्तुशास्त्रानुसार बंगला बांधताना.....

आज-काल शहरी भागात बंगला बांधण्याचे प्रमाण फ्लॅट संस्कृतीमुळे खूप कमी झालेलं आहे. पण निमशहरी भागात मात्र अजूनही बंगल्या विषयीचे आकर्षण हे सर्वसामान्य माणसाचं कमी झालेलं नाहीये. मुळात बंगला किंवा एक बैठ घर म्हटलं की जे घर पण येतं ते कुठल्याही आलिशान फ्लॅटमध्ये, अलिशान रो बंगल्यामध्ये, रो हाऊस मध्ये हे येऊ शकत नाही. कितीही आधुनिक पद्धतीनुसार ते बांधलं तरी त्या भूमीशी त्या वास्तूची आणि त्या वास्तू मधल्या सदस्यांची नाळ कायम राहिली पाहिजे. त्यासाठी काही बाबींचा प्रकर्षाने विचार करावा लागतो.

बंगल्यासाठी प्लॉट बघताना प्लॉट ला अॅप्रोच रोड, या रोडचा उतार लेआउटचा असलेला उतार यांचा प्रामुख्याने विचार होणं गरजेचे असते. पण बऱ्याच वेळेला जवळजवळ ९९% हे दुर्लक्षित केले जाते. वास्तुशास्त्राची सुरुवात अगदी मुळापासून छोट्या छोट्या गोष्टीनून केली तरच त्याचा उपयोग होतो. नुसत्या रचनेचा हा अपेक्षित परिणाम अनुभवता येत नाही आणि मग त्याच्यामुळे शास्त्र बदनाम होऊ शकते. रोड नंतर प्लॉटवरील व्यवस्थेचा विचार करावा लागतो. तिथला नैसर्गिक पाणीसाठा, पाण्याची टाकी, सोकपिट, विविध चेंबर्स, गरज असेल तर प्लॉटवर करायचे चढ उतार. या जागा नक्की झाल्या की आपल्याला बंगला कसा बांधायचा आहे, पार्किंगची काय व्यवस्था करायची आहे, किती मजले बांधायचे आहेत त्याची गरज आहे का?कि ग्राउंड फ्लोअर वर बांधायचा आहे? आपली नक्की गरज किती आहे? घरातले सदस्य किती आहेत? त्यांच्या गरजा काय आहेत, बंगला बांधणारी व्यक्ती ही व्यावसायिक आहे का नोकरी करणारी आहे? तिची आत्ताची सामाजिक स्थिती काय आहे? कारण आपण नवीन घरात जातो म्हणजे आयुष्यात एक मोठा बदल आपण स्वीकारलेला असतो या स्वीकारलेल्या बदलाचा आपल्याला निश्चितपणे चांगला उपयोग होण्यासाठीच आपण शास्त्राचा आधार घेतो म्हणून हा विषय फार महत्त्वाचा ठरतो. त्यासाठी सदरहून फॅमिली ची बॅकग्राऊंड आपल्याला चर्चा करून विचारात घ्यावी लागते. ह्या सगळ्याचा विचार करून बंगला बांधला तर त्याचा चांगला उपयोग होऊ शकतो आणि अपेक्षित असे वास्तुशास्त्रीय परिणाम त्याला उपभोगायला मिळतात.

प्लॉटला अॅप्रोच रोड नुसार त्या प्लॉटची रचना आणि भवनाची रचना ठरते कारण अप्रोच रोडला जे प्रवेशद्वार येतं ते भवनाशी घड्याळाच्या काट्याच्या दिशेने म्हणजे क्लॉकवाईज असणं हे शास्त्रात महत्त्वाचं सांगितलेलं आहे. जेणेकरून आपल्या सर्व कामांना सिक्वेन्स प्राप्त होईल आणि हे भवनाचे प्रवेशद्वार नक्की झाल्यानंतर अंतर्गत हवा घ्यायची राहण्यासाठी खिडक्यांची योजना ही त्या वास्तूचं तपमान सामान्य ठेवण्यास अतिशय मदत करते. तपमानाचा विचार आयुष्यात घडणाऱ्या घटनांची करायचा असतो त्यामुळे कोणतीही वास्तू बांधकाम करताना तिथे तपमान सामान्य कसं राहू शकेल घरातल्या सगळ्यांना त्याचा बऱ्यापैकी सारखा कसा उपयोग होईल याचा प्रामुख्याने विचार करणे गरजेचे आहे. खरंतर या सगळ्या बाबी प्लॅन करतानाच विचारात घ्याव्या लागतात. हा प्लान एकदा व्यवस्थित झाला की आपल्याला आरसीसी डिझाईन करावं लागतं. हे आरसीसी डिझाइन केल्यानंतर कुठले कॉलम कुठले बीम हे ह्या प्लॉटवरच्या ४५ वास्तू देवतांना कुठे धक्का लावत नाहीत ना हे पहावं लागतं. ह्या ४५ देवता म्हणजे एक प्रकारे त्या वास्तूचा संपूर्ण ऊर्जा स्त्रोत असतो. समजा धक्का लागत नसेल तर उत्तमच आहे, पण कुठे काही गोष्टी अडचणीच्या ठरत असतील, वास्तुतल्या ऊर्जा स्त्रोतांना म्हणजेच कोणत्याही देवतेला धक्का लागत असेल तर कॉलम मध्ये आणि त्या अनुषंगाने प्लान मध्ये काही बदल करणे पण आवश्यक ठरतं. काही अपरिहार्य असेल तर तिथे सुरुवातीपासूनच उपाय करावे लागतात. त्याच्याकडे कानाडोळा करून चालत नाही.

बाकी बांधकामाचे मटेरियल वाळू ,वीट, दगड खडी हे त्या मालकाच्या आवडीवर, बजेटवर बऱ्याचशा गोष्टी अवलंबून असतात. एकदा प्रवेशद्वाराची जागा नक्की झाल्यानंतर इतर वेंटिलेशनच्या बाबतीत उदाहरणार्थ खिडक्या अंतर्गत दरवाजे यांचे पोझिशनचा प्रत्यक्ष जागेवर विचार करून अपेक्षित परिणाम साधून द्यावा लागतो.बांधकाम उभा करतानाच व्यक्तीच्या गरजेनुसार रीतसर मांडणी करावी लागते. म्हणजे तिथे राहायला गेल्यावर त्याची अडचण होत नाही. बांधकाम उभे राहताना वेळोवेळी व्हिजिट करावे लागतात.काही चुकत असेल तर लक्षात आणून द्यावं लागतं करेक्शन करावी लागतात. एकदा आरसीसी आणि वीट बांधकाम यांचा ढाच्या उभा राहिल्यानंतर वास्तूच्या कोणत्या भागात प्लास्टर चे किती थर लावायचे किंवा त्याचं काय टेक्स्चर करायचं हा विचार केला जातो. त्यानंतर तिथे जे फ्लोरिंग करायचं आहे तर अशा वेळेला मार्बलची रचना केलेली अतिशय उत्तम ठरतं. त्या वास्तूच्या एप्रोच रोड नुसार आणि त्या वास्तूतल्या प्रत्येक सदस्याला उपयुक्त होईल अशा प्रकारचं मार्बलचं डिझाईन अर्चना तिथे केली जाते. मुळात मार्बल म्हणजे नैसर्गिक दगड. ज्यात स्वतःच वेगळेपण आहे जेणेकरून नैसर्गिक ऊर्जा त्याच्यात साठवली जाते जपली जाते आणि उपयोगात आणली जाते. दगडामध्ये असलेली सच्छिद्रता म्हणजेच पोरोसिटी ही आपल्या वास्तूच्या ऊर्जा टिकवायला विशेष कामी येते. म्हणून तर मंदिरात सुद्धा मार्बलचा यथेच्छ वापर केला जातो.

त्यानंतर व्यक्तिनिहाय पंचतत्वांची सांगड घालत रूमच्या वाटण्या, हॉल, स्वयंपाक घर, मास्टर बेडरूम, मुलांसाठी बेडरूम, घरात येणार्या पाहुणे मंडळींसाठी गेस्ट रूम, घरात एखादं केलेले जिम, एखादा होम थिएटर, या सगळ्यांच्या वाटण्या तसंच आवश्यक असेल तिथे लिफ्ट या सगळ्यांचा रचनेत विचार करून तद अनुषंगाने तिथे तशा तशा सोयी करून अंतर्गत फर्निचर पूर्ण केले जाते. गरज असेल तिथे फॉल सीलिंग केलं तर त्याचा सगळ्यात जास्त उपयोग होतो. नुसता आपण एखाद्या ठिकाणी पाहिलं आपल्याला आवडलं आणि आपण ते आपल्या वास्तुत केलं किंवा चार लोक करतात किंवा मान ठेवतात म्हणून आपण करायचं ही वृत्ती फॉल सीलिंग च्या बाबतीत नंतर आयुष्यभर महागाची ठरते. बांधकाम करताना हे बारीकसारीक विचार करावे लागतात. या सगळ्या गोष्टींचा आपल्या जीवनशैलीवर खूप मोठा परिणाम होत असतो. नवीन वास्तुत गेल्यानंतर कधी कधी आपली सामाजिक स्थिती बिघडली जाते काही लोक उगीच तुटतात, नको असलेली लोक उगीचच जोडली जातात, हा सगळा त्या अंतर्गत रचनेचा विचार न करता केलेला भाग असतो. त्यानंतर येतात घराचे रंग घराला एकच रंग द्यायचा की कुठल्या भिंती हायलाईट करायच्या. रंग हे शक्यतो फिकट वापरायचे असतात . सौम्य रंगांचा उपयोग हा दूरगामी होतो, तर गडद रंगांचा उपयोग हा कदाचित जीवनशैली बिघडवून टाकू शकतो. मग शक्य असेल तिथे त्या व्यक्तीच्या राशीनुसार सुद्धा रंगरचना आपल्याला करता येते किंवा अशा कुटुंबातल्या सगळ्यांचे पत्रिकेचे विचार करून सुद्धा घराला सुलभ एकच रंग देता येतो. याचा परिणाम सुद्धा खूप दूरगामी चांगला होऊ शकतो. त्या भवनाला येणारे पडदे पडदे हे आपण आपल्या आवडीनुसार सौम्य रंगाचे घेऊ शकतो ह्या पडद्यांचा उपयोग जसा आडोसा आहे तसंच व्हेंटिलेशन टिकवणे हा सुद्धा आहे.

नंतर वास्तुशांती आणि तद अनुषंगाने काही आवश्यक पूजा पाठ करून अशा भावनाचा राहण्यासाठी उपभोग घ्यायचा असतो.

**– कौस्तुभ काळे,** वास्तू वाचस्पती, अहिल्यानगर, मो. ९८५०९४१८८१



एकल महिला मेळाव्यात जानकी निमसे, शिशेलिया मनेल, सविता पेहेरे, वैशाली गोंधळे प्रमिला पाटकर, भाग्यश्री दराडे या एकल महिलांना पुरस्काराने सन्मानित करताना महापौर ज्योती गाडे व इतर.

# ‘आदर्श एकल महिलांना पुरस्कार’ ही जगदंब फाउंडेशनची उत्कृष्ट संकल्पना

### महापौर ज्योती गाडे यांचे प्रतिपादन, अहिल्यानगर महापालिका, जगदंब फाउंडेशन व साऊ एकल महिला समितीच्या महामेळाव्यात विविध उपक्रम

नगर – अनेक संकटावर मात करून ज्या एकल महिलांनी व्यवसाय सुरू करून स्वतःचे कुटुंब सावरले व प्रगती केली अशा एकल महिला शोधून त्यांना पुरस्कार देण्याची ही जगदंब फाउंडेशनची संकल्पना खूप उत्कृष्ट आहे, असे उद्गार महापौर ज्योती गाडे यांनी मेळावा प्रसंगी काढले.

अहिल्यानगर महानगरपालिका, जगदंब फाउंडेशन व साऊ एकल महिला समिती यांच्या संयुक्त विद्यमाने महानगरपालिकेच्या राजमाता जिजाऊ सभागृहामध्ये नुकताच एकल महिलांचा रोजगार मेळावा पार पडला. यामध्ये कडधान्य वाटप, बॅग वाटप, महिलांना पुरस्कार वितरण, पैठणी सह लकी ड्रॉ, रोजगार उद्योग विषयाबाबत चर्चासत्र व विविध शासकीय योजनांची माहिती असे विषय होते.

महिला बालकल्याण सभापती दिपाली बारस्कर यांनी एकल महिलांसाठी महापालिकेमार्फत चांगले मोठे प्रकल्प नक्कीच राबविले जातील असे आश्वासन फाउंडेशनला दिले.

या महामेळाव्याचे चोख असे नियोजन फाउंडेशनचे अध्यक्ष गणेश लंघे, कार्याध्यक्षा जयश्री कुटे, साऊ समितीचे जिल्हाध्यक्ष व फाउंडेशनचे सचिवअशोक कुटे, प्रकाश इथापे, दत्तात्रय उरमुडे, अश्विनी झरेकर, सुजाता गोरे, अश्विनी जाधव, सावित्रा प्रशांत गायकवाड यांनी केले होते.

माजी उपमहापौर गीतांजली काळे व माजी महिला बालकल्याण सभापती, विद्यमान नगरसेविका पुष्पाताई बोरुडे यांनी एकल महिलांचा असा मेळावा प्रथमतःच नगर महानगरपालिकेमध्ये घडत आहे असे म्हणून फाउंडेशनच्या उत्कृष्ट नियोजनाबद्दल त्यांचे कौतुक केले. सर्वांनी एकल महिलांचा सन्मान करावा असे त्यांनी आवाहन केले. आम्ही सदैव एकल महिलांच्या पाठीशी असल्याबाबत दोघींनी सांगितले.

या मेळाव्यासाठी महिला बालकल्याण उपसभापती वर्षा सानप, नगरसेविका रोशनी त्र्यंबके, अनिता शेटिया, सुजाता पडोळे, पौर्णिमा गव्हाळे, वर्षा काकडे, सुनीता कांबळे, मयुरी जाधव, कमल कोतकर, तालुका कृषी अधिकारी क्रांती चौधरी, उपजिल्हा महिला बालकल्याण अधिकारी संजय सांगळे, शहर बाल विकास प्रकल्पाधिकारी महादेव जायभाय, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी प्रशांत गायकवाड इत्यादींची प्रमुख उपस्थिती होती

यावेळी अमृता जाधव व रेवती धापटकर यांनी एकल महिलांसाठी दिग्विजय पार्किंगमध्ये रोजगार, नोकरीची संधी असल्याबाबत सविस्तर माहिती दिली. तालुका कृषी अधिकारी क्रांती चौधरी, जयश्री कुटे, प्रकाश इथापे, अश्विनी झरेकर, प्रशांत गायकवाड यांनी विविध विषयावर मार्गदर्शन केले, चर्चासत्र घेतले. उत्कृष्ट असे सूत्रसंचालन भाऊसाहेब नगरे यांनी केले.

मेळाव्यातील वेगळा, महत्त्वाचा घटक म्हणजे जानकी निमसे, शिशेलिया मनेल, सविता पेहेरे, वैशाली गोंधळे, प्रमिला पाटकर, भाग्यश्री दराडेया आदर्श एकल महिलांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच जिल्हा महिला बालविकास कार्यालयातील आदर्श महिला कर्मचारी रुपाली वाव्हळ, श्रद्धा अंधारे, मीना विटुरे यांना देखील एकल महिला व त्यांच्या मुलांच्या उत्कृष्ट कामकाजाबाबत पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी सर्व महिलांना मोठ्या प्रमाणात जगदंब फाउंडेशन व साऊ समितीच्या वतीने कडधान्याचे वाटप करण्यात आले. लकी ड्रॉ मध्ये दहा गिफ्ट व एक पैठणी साडीचे वितरण करण्यात आले.

अशोक कुटे यांनी प्रास्ताविक मध्ये महिलांना जास्तीत जास्त रोजगार मिळवून देण्यासाठी आम्ही प्रयत्न करत असल्याचे सांगितले.

सविता खोमणे व मोनिका औटी या एकल महिलांनी संस्थेच्या कार्याबाबत आपल्या भावना व्यक्त केल्या. सर्वांना नाश्ता देण्यात आला. महाराष्ट्रातील इतर महानगरपालिकांपैकी एकल महिलांचा असा पहिलाच मेळावा अहिल्यानगर महानगरपालिकेमध्ये झाल्याबाबत सर्व नगरसेविका व सर्व महिलांनी समाधान व्यक्त केले. भविष्यात एकल महिलांना मदतीसाठी ८८४७७२४६८० या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले.

# डी. वाय. पाटील पुणे विद्यापीठाचा चित्र शिल्पकार प्रमोद कांबळे यांना ‘जीवनगौरव’ पुरस्कार जाहीर



नगर – पुणे येथील डी. वाय. पाटील इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ अप्लाइड आर्टस् अॅण्ड क्राफ्ट्सतर्फे आयोजित ’आकृती २०२५-२६’ या वार्षिक शैक्षणिक कला प्रदर्शनाचे उद्घाटन १० एप्रिल रोजी होणार आहे. या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे जागतिक कीर्तीचे चित्र शिल्पकार प्रमोद कांबळे यांना यंदाचा मानाचा ’डॉ. डी. वाय. पाटील जीवनगौरव पुरस्कार २०२६’ देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

प्रमोद कांबळे यांच्या कलेचा प्रवास थक्क करणारा आहे. नुकत्याच झालेल्या गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर अयोध्येत त्यांच्या कलेचा विशेष सन्मान करण्यात आला. यासोबतच त्यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा ’जीवनसाधना गौरव पुरस्कार’, नाशिकच्या वसंत व्याख्यानमालेत ’गोदावरी गौरव पुरस्कार’ आणि मागील वर्षी भारतीय कलाप्रसारिणी सभेच्या अभिनव कला महाविद्यालयातर्फे दिला जाणारा ’जीवनगौरव पुरस्कार’ प्राप्त झाला आहे. केवळ नागरी सन्मानच नव्हे, तर हैदराबाद येथे भारतीय लष्कराकडून त्यांचा विशेष सन्मान झाला असून, भारतीय वायुदलाच्या एअर चीफ मार्शल यांच्या हस्ते विशेष मेडल देऊनही त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. पुणे येथे नॅशनल डिफेन्स अॅकॅडमी मध्ये त्यांनी उभारलेल्या ’शौर्य’ स्मारकाबद्दल त्यांचा भारतीय सैन्य दलाच्या प्रमुखांकडून विशेष मेडल देऊन सन्मान करण्यात आला. त्यांच्या या समृद्ध योगदानाची दखल घेऊनच डी. वाय. पाटील विद्यापीठाने हा सर्वोच्च सन्मान जाहीर केला आहे.

१० एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता आकुर्डी येथील विद्यापीठ परिसरात हा सोहळा होईल. या कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून ’हंग्री फिल्म्स’चे संचालक आणि जाहिरात क्षेत्रातील महेश घरत उपस्थित राहणार आहेत, तर अतिथी म्हणून कलाकार पराग बोरसे उपस्थित राहतील. जे बिल्डिंग, पहिला मजला, गणेश आयडॉल जवळ, डी. वाय. पाटील इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी, आकुर्डी येथे विद्यार्थ्यांनी साकारलेल्या कलाकृतींचे दर्शन सर्वांना घेता येईल.

सोहळ्याला कुलपती डॉ. संजय डी. पाटील, कुलगुरू प्रा. मनीष भल्ला आणि स्कूल ऑफ अप्लाइड आर्ट्स अँड क्राफ्ट्सचे संचालक जयप्रकाश कलवाले उपस्थित राहणार आहेत. मुंबई येथील फोर्ट भागात भारतीय रिझर्व बँकेच्या चौकात इमारतीसमोर रिझर्व बँकेचे बोधचिन्ह तसेच रुपी सिम्बॉल चे स्मृतिशिल्प, आणि मुंबईच्या वानखेडे स्टेडियम मध्ये भारतरत्न सचिन तेंडुलकर यांचा २२ फुटी पूर्ण कृती पुतळा, अयोध्येतील प्रदक्षिणा मार्गावर रामायणातील प्रसंगावर आधारित शिल्पकृती ही त्यांच्यासाठी आणि नगरकरांसाठी खरोखरच अभिमानास्पद कामगिरी आहे अशा प्रतिक्रिया या निमित्ताने व्यक्त होत आहेत



शहरातील पाईपलाईन रस्त्यावरील आनंदबन कॉलनी मध्ये आयोजित छोटेखानी सत्कार कार्यक्रमात अमोल गाडे यांचा सत्कार करण्यात आला.

# नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी सदैव कटिबद्ध

### उदयोजक अमोल गाडे यांचे आश्वासन

नगर – शहरी भागातील दररोज नवनवीन समस्यांना सामोरे जावे लागते. या भागातील नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी महापौर यांच्यासह नगरसेवक कटिबद्ध असल्याचे महापौर ज्योती गाडे यांच्या वतीने अमोल गाडे यांनी सांगितले.

शहरातील पाईपलाईन रस्त्यावरील आनंदबन कॉलनी मध्ये आयोजित छोटेखानी सत्कार कार्यक्रमात बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अनिल मुरकुटे हे होते. यावेळी व्यासपीठावर नगरसेवक अजिंक्य बोरकर, करण कराळे, ऋग्वेद गंधे उपस्थित होते.

यापुर्वी सर्व नगरसेवक यांनी पाइपलाईन रस्त्यावर सुरू असलेल्या गटार दुरुस्ती कामाची पाहणी केली. त्यांनी संबधित कंत्राटदाराला सूचना दिल्या.

यावेळी बोलताना अमोल गाडे यांनी सांगितले की, आमदार संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली शहराचा विकास होत आहे. छोट्या कॉलनीत विकास कामे होत आहेत. नागरिकांना येत असलेल्या समस्या त्यांनी पुढे येऊन सांगाव्यात. तसेच सुचना करण्यात.

यावेळी बोलताना नगरसेवक अजिंक्य बोरकर सांगितले की, नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी आम्ही २४ तास उपलब्ध आहोत. नागरिकांनी आपल्या अडचणी सोबत सुचना ही करण्याची विनंती केली.

यावेळी करण कराळे, ऋग्वेद गंधे यांनी आपले विचार व्यक्त केले. यावेळी नगरसेवक अणि नागरिकांमध्ये चर्चा झाली. यावेळी सच्चिदानंद पवार, कोल्हे, आर्किटेक्ट इंजीनियर साळुंखे, गोखले, श्रीकांत पुंडे, आर्की. उदयन पवार, संजय कोल्हे, शहाणे, रोहीत कोडम, मेमाने, शेख उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनोज सातपुते यांनी केले.

# नागरदेवळे येथे १० एप्रिल रोजी मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

### ‘फिनिक्स’तर्फे महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचा उपक्रम

नगर – फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने महात्मा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त १० एप्रिल रोजी मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.



हे शिबिर नागरदेवळे येथील संत सावता महाराज मंदिर परिसरात पार पडणार आहे. या शिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन फिनिक्स सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांनी केले आहे.

या शिबिरामध्ये तज्ज्ञ नेत्ररोग डॉक्टरांकडून अद्ययावत यंत्रसामग्रीच्या सहाय्याने मोफत नेत्र तपासणी करण्यात येणार आहे. यासोबतच जेष्ठ नागरिकांसाठी रक्तदाब, मधुमेह तसेच इतर आवश्यक आरोग्य तपासण्या देखील मोफत करण्यात येणार आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना एकाच ठिकाणी सर्वसमावेशक आरोग्य सेवा मिळणार आहे.

नेत्र तपासणीनंतर ज्यांना शस्त्रक्रियेची आवश्यकता भासेल, अशा रुग्णांवर पुणे येथील के.के. आय बुधराणी हॉस्पिटलमध्ये मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. यामध्ये मोतीबिंदू, काचबिंदू तसेच लहान मुलांच्या तिरळेपणावरील शस्त्रक्रियांचा समावेश आहे. विशेष बाब म्हणजे, या शस्त्रक्रियेसाठी रुग्णांचे पुणे येथे येणे-जाणे, राहण्याची व जेवणाची संपूर्ण व्यवस्था मोफत करण्यात आली आहे.

या शिबिरासाठी नाव नोंदणी करण्यासाठी किंवा अधिक माहितीसाठी जालिंदर बोरुडे (मो. ९८८१८१०३३३) या क्रमांकावर संपर्क साधावा, असे फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने सांगण्यात आले आहे.

# दिल्ली गेट परिसरात आयोजित शिबिरात २५० रुग्णांची मोफत नेत्र तपासणी

### ७० जणांचे मोतीबिंदू ऑपरेशन

नगर – शहरातील दिल्ली गेट परिसरात आयोजित करण्यात आलेल्या मोफत नेत्रतपासणी शिबिरास नागरिकांचा प्रतिसाद मिळाला. शमी गणपती मंदिरासमोर, कानूर पठार पतसंस्था येथे सुरू असलेल्या या शिबिरात एकूण २५० रुग्णांची डोळ्यांची तपासणी करण्यात आली असून, त्यापैकी ७० रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी मोफत निवड करण्यात आली आहे.




दिल्ली गेट परिसरात आयोजित करण्यात आलेल्या मोफत नेत्रतपासणी शिबिरास नागरिकांचा प्रतिसाद मिळाला.

पुणे येथील एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालयाच्या तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर पार पडत असून, डॉ. आनंद किशोर बोज्ञा (नेत्रचिकित्सक) यांनी स्वतः रुग्णांची तपासणी करून त्यांना योग्य उपचाराबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना डॉ. बोज्ञा म्हणाले की, पूर्वी मोफत शिबिरांबाबत लोकांमध्ये शंका आणि भीती होती. शस्त्रक्रिया योग्य होणार नाही, अशी भावना अनेकांच्या मनात होती. मात्र आज अत्याधुनिक तंत्रज्ञान, अनुभवी डॉक्टर आणि सेवा-भावी संस्थांच्या योगदानामुळे ही भीती दूर होत असून, अशा शिबिरांमुळे हजारो रुग्णांना नवदृष्टी मिळत आहे.

या शिबिराच्या माध्यमातून शहरासह उपनगर व ग्रामीण भागातील नागरिकांनाही लाभ होत असल्याचे दिसून आले. ज्येष्ठ नागरिकांनी तपासणी करून घेतली असून, मोतीबिंदूचे निदान झालेल्या रुग्णांना मोफत शस्त्रक्रियेची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांनाही गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा मिळत असल्याने समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

या उपक्रमात रोटरी क्लब ऑफ नगर (आदेशा) चे नितीन थाडे यांचे सहकार्य लाभले. तसेच वेदांत व्यंकटेश बोमादंडी यांनी शिबिराचे नियोजन, समन्वय व रुग्ण व्यवस्थापनाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. त्यांच्या प्रयत्नांमुळे शिबिर सुरळीत पार पडत असून रुग्णांकडूनही समाधान व्यक्त केले जात आहे.

मोफत आरोग्य सेवा तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने हे शिबिर सोमवार ते शनिवार सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत सुरू असून, अधिकाधिक नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

अधिक माहितीसाठी वेदांत व्यंकटेश बोमादंडी (संपर्क : ७७५७८१५९८९ / ०२०-२६९७४१०९) यांच्याशी संपर्क साधावा.



आसारामजी बापू यांच्या ९०व्या अवतरण दिनानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम उत्साहात पार पडले.

# गुलमोहर रोडवरील आश्रमात आसाराम बापूंचा अवतरण दिन साजरा

नगर – गुलमोहर रोड येथील श्री संत आसाराम बापू आश्रमात आसारामजी बापू यांच्या ९०व्या अवतरण दिनानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम उत्साहात पार पडले. गेल्या पन्नास वर्षांपासून बापूजी हिंदू व सनातन संस्कृतीचा प्रसार देश-विदेशात करत असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली जगभरात सुमारे ४५० आश्रम आणि २००० योग वेदांत केंद्र कार्यरत आहेत. या अवतरण दिनानिमित्त आश्रमात विविध सोहळ्यांचे आयोजन करण्यात आले होते. संध्याकाळी बापूजींची मिरवणूक काढण्यात आली. दुसऱ्या दिवशी सकाळी पादुका पूजन, होम-हवन यांसह धार्मिक विधी पार पडले. तसेच बापूंच्या जन्मोत्सवानिमित्त पारंपरिक पाळणा गाऊन पाळणा हलविण्यात आला. यावेळी ९० दिवे प्रज्वलित करून ५६ भोगांचा नैवेद्य अर्पण करण्यात आला व भजन-कीर्तनाच्या वातावरणात वाढदिवस साजरा करण्यात आला.

यावेळी जय रंगलानी, शिंदेताई, भगवान गवळी, शिवाजी शेळके, गोकुळ धाडगे, सुरेखाताई सांगळे, सुरज रवे आदींसह भक्तगण उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. तसेच बापूजींच्या ‘ऋषी प्रसाद’ अंकाचे वितरण करण्यात आले.

# राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणच्या प्रकल्प संचालकांकडे ५० हजारांची खंडणी मागणाऱ्या तिघांवर गुन्हा दाखल

नगर – भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाचे (एनएचएआय) प्रकल्प संचालक अमरीश माणिकराव मानकर यांना कार्यालयात घुसून धमकावत दरमहा ५० हजार रुपयांच्या खंडणीची मागणी केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात किरण शिवाजी राऊत, संदीप भास्कर भगत आणि ड. हर्षद चावला यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी अमरीश मानकर हे मार्केटयार्ड येथील 'एनएचएआय' कार्यालयात प्रकल्प संचालक म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अहिल्यानगर ते मनमाड रस्ते विकासाचे काम सुरू आहे. ६ एप्रिल रोजी किरण राऊत, संदीप भगत आणि हर्षद चावला हे विनापरवाना कार्यालयात घुसले. तुम्हाला रस्त्यावर फिरू देणार नाही, जर काम करायचे असेल तर दरमहा ५० हजार रुपये द्यावे लागतील, अशी धमकी त्यांनी मानकर यांना दिली. त्यानंतर ८ एप्रिल रोजी पुन्हा राऊत आणि भगत कार्यालयात आले आणि पैशांची विचारणा करत सरकारी कामात अडथळा निर्माण केला.

तसेच किरण राऊत याने फोनवरून कंत्राटदारांची बिले न काढण्याची धमकी दिली होती. आरोपींनी महामार्गावर काम करणाऱ्या इंजिनिअर व कामगारांचे विनाकारण फोटो काढून त्यांना त्रास दिल्याचेही फिर्यादीत म्हटले आहे. या सततच्या त्रासाला कंटाळून मानकर यांनी कायदेशीर तक्रार दिली असून, पोलिसांनी तिघांवर गुन्हा दाखल केला आहे. पोलीस उपनिरीक्षक शीतल मुगडे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

### ॲडव्होकेट हर्षद चावलावर एकाच दिवशी खंडणीचे २ गुन्हे

दरम्यान यातील संशयित आरोपी ॲड. हर्षद चावला याच्यावर एकाच दिवशी खंडणी मागितल्या प्रकरणी तोफखाना व कोतवाली पोलिस ठाण्यात २ वेगवेगळे दाखल झाले आहेत. पहिला गुन्हा तोफखाना पोलिस ठाण्यात दाखल झालेला आहे. याबाबत एका राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याच्या मुलीने फिर्याद दिली आहे.

पीडित डॉक्टर तरुणी ६ एप्रिल रोजी सकाळी ११.४५ च्या सुमारास सिव्हील हॉस्पिटल येथील सिव्हील सर्जन कार्यालयासमोर दुचाकी पार्किंगमध्ये नोकरीचा अर्ज देण्यासाठी आली होती. यावेळी आरोपी हर्षद चावला याने तिचा पाठलाग केला. पीडितेचे आणि तिच्या डॉक्टर बहिणीचे खाजगी व्हिडिओ आपल्याकडे असल्याचे सांगून ते सार्वजनिक करण्याची धमकी त्याने दिली.

या व्हिडिओच्या बदल्यात आरोपीने दोन लाख रुपयांची मागणी केली. पैसे न दिल्यास संपूर्ण कुटुंबाची बदनामी करण्याची आणि दोन्ही बहिणींचे वैद्यकीय क्षेत्रातील करिअर संपवून टाकण्याची धमकी त्याने दिली. त्यामुळे हा गुन्हा दाखल झालेला आहे. त्यानंतर सायंकाळी एनएचएआय चे प्रकल्प संचालक मानकर यांच्या फिर्यादी वरून कोतवाली पोलिस ठाण्यात दुसरा गुन्हा दाखल झाला आहे.

# पारनेर बाजार समिती सभापतीपदी गंगाराम बेलकर, उपसभापतीपदी संदीप सालके यांची बिनविरोध निवड


पारनेर बाजार समितीच्या सभापतीपदी गंगाराम बेलकर, उपसभापतीपदी संदीप सालके यांची बिनविरोध निवड झाल्यावर त्यांचा सत्कार करताना खा.निलेश लंके व पदाधिकारी.

पारनेर – पारनेर तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदी गंगाराम बेलकर तर उपसभापतीपदी संदीप सालके यांची ९ एप्रिल रोजी बिनविरोध निवड झाली आहे. निवड जाहीर होताच कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतिषबाजी करत आणि गुलाल उधळत जल्लोष साजरा केला.

माजी सभापती किसनराव रासकर आणि उपसभापती किसनराव सुपेकर यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर ही पदे रिक्त झाली होती. त्यानंतर निवडणूक प्रक्रिया पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून विकास जाधव यांनी कामकाज पाहिले. निवडीनंतर खासदार निलेश लंके यांच्या उपस्थितीत नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

गंगाराम बेलकर हे तालुक्यातील ज्येष्ठ व अनुभवी नेतृत्व म्हणून ओळखले जातात. पंचायत समितीचे माजी सभापती म्हणून त्यांनी यशस्वी कामगिरी बजावली असून, प्रशासनाचा दांडगा अनुभव त्यांच्या पाठीशी आहे. त्यांच्या पत्नी सौ. अरुणा बेलकर यांनीही पंचायत समितीच्या उपसभापतीपदाची जबाबदारी सांभाळलेली आहे. त्यामुळे त्यांच्या निवडीकडे स्थिर आणि अनुभवी नेतृत्व म्हणून पाहिले जात आहे. उपसभापतीपदी निवड झालेले संदीप सालके हे खासदार निलेश लंके प्रतिष्ठानचे विश्वासू व जुने सहकारी म्हणून ओळखले जातात. एका निष्ठावान युवा कार्यकर्त्याला संधी देऊन खासदारांनी तरुण नेतृत्वाला चालना दिल्याचे बोलले जात आहे.

या निवडीपूर्वी खासदार निलेश लंके यांच्या कार्यालयात महत्त्वाची बैठक पार पडली होती. या बैठकीत बेलकर आणि सालके यांच्या नावावर अंतिम शिक्कामोर्तब करण्यात आले आणि त्यानुसार निवड बिनविरोध पार पडली. तीन वर्षांपूर्वी खासदार लंके यांच्या नेतृत्वाखाली बाजार समितीत सत्तांतर झाले होते. सुरुवातीला बाबासाहेब तरटे आणि बापू शिर्के यांना संधी देण्यात आली होती. त्यानंतर किसनराव रासकर आणि किसनराव सुपेकर यांनी कार्यभार सांभाळला. आता तिसऱ्या टप्प्यात बेलकर आणि सालके यांच्याकडे ही धुरा सोपवण्यात आली आहे.

निवडीची घोषणा होताच राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) आणि निलेश लंके प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. यावेळी माजी सभापती बाबासाहेब तरटे, किसनराव रासकर, किसन सुपेकर, बापूसाहेब शिर्के, राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष अर्जुन भालेकर, डॉ. बाळासाहेब कावरे, नगरसेवक योगीराज गाडे, रा. या. औटी, अशोक कटारिया, पद्मजा पठारे, छाया रोकडे, बाबासाहेब नर्हे, चंदन भळगट, विजय पवार, आबासाहेब खोडदे, सरपंच प्रकाश गाजरे, राष्ट्रवादीचे प्रवक्ते मोहनराव रोकडे, जितेश सरडे, सचिन पठारे, रवींद्र राजदेव, शहराध्यक्ष संदीप मते, रायभान औटी, शिवाजी बेलकर, उद्योजक संतोष गायखे, बाळासाहेब खिलारी, श्रीरंग रोकडे, रवींद्र गायखे, तुकाराम चव्हाण, संदीप चौधरी, भूषण शेलार, बाळासाहेब दिघे, पंकज बेलकर, चैतन्य बेलकर, ॲड. गणेश कावरे, लखन ठाणगे, गणेश गायखे, रामदास साळवे, प्रमोद गुगळे, शिवाजी भोसले, बाळासाहेब दाते, शांताराम बेलकर, अरुण बेलकर, सर्व संचालक व कार्यकर्ते उपस्थित होते.



बुरुडगाव रोडवरील 'नक्षत्र लॉन्स' येथे आयोजित 'हिंदु संमेलन' उत्साहात झाले. धर्मजागृती करण्याच्या उद्देशाने आयोजित या संमेलनात सकल हिंदु समाज सहभागी झाला होता.

# संस्कृती, एकता व धर्मजागृतीचा विराट सोहळा हिंदु संमेलन उत्साहात

नगर – बुरुडगाव रोडवरील 'नक्षत्र लॉन्स' येथे आयोजित ८ एप्रिल रोजी 'हिंदु संमेलन' उत्साहात झाले. धर्मजागृती, संस्कृती संवर्धन आणि समाजातील एकता बळकट करण्याच्या उद्देशाने आयोजित या संमेलनात सकल हिंदु समाज सहभागी झाला होता.

या संमेलनात डोंगगण येथील ह.भ.प. जंगले शास्त्री महाराज, भक्तीयोगाचार्य यशोविजयजी समुदायचे गुणीवर्य तत्वरुचि विजय म.सा., प्रवचनकार मुनी प्रवरश्री जिनरत्नविजय म.सा., तसेच मुनीश्री हितार्थयोग विजय म.सा. आणि अतुल अग्निहोत्री उपस्थित

ह.भ.प. श्री. जंगले शास्त्री महाराज यांनी आपल्या ओजस्वी मार्गदर्शनात हिंदु समाजाने एकत्रित येऊन धर्मरक्षण, संस्कृती संवर्धन आणि राष्ट्रहितासाठी कटिबद्ध राहण्याचे आवाहन केले. त्यांच्या विचारांनी उपस्थितांमध्ये नवचैतन्य आणि उत्साह निर्माण झाला.

यावेळी संमेलन समितीचे सदस्य मयूर वांढेकर यांनी सांगितले की, समाजातील सर्व स्तरांतील नागरिकांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे हे संमेलन अत्यंत यशस्वी झाले असून, भविष्यातही अशा उपक्रमांच्या माध्यमातून समाज एकत्र येत राहील.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी हिंदु संमेलन समितीचे सदस्य कृष्ण फुलसौंदर, शुभम वालेकर, निखिल फुलसौंदर, वरुद लोंढे, जय संचेती, कुणाल गायकवाड, चेतन भगत आणि उमेश मुळे, महावीर गांधी, अथर्व पुंड, अक्षय शिंगणे, संजय शिंदे, अभिजीत ठमके, निखिल हजारे, महेश फुलसौंदर, अभि झावरे, महावीर बोरा व मित्र मंडळ यांनी परिश्रम घेतले.

# स.पो.नि. प्रल्हाद गिते यांची पोलिस निरीक्षकपदी पदोन्नती



नगर – राहुरी पोलिस ठाण्यात कार्यरत असलेले सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रल्हाद भानुदास गिते यांची पोलिस निरीक्षक पदी पदोन्नती झाली आहे. त्यांना पुणे येथे राज्य गुन्हे अन्वेषण विभागात (सीआयडी) नियुक्ती देण्यात आली आहे. गिते यांना शासननिर्णयानुसार त्यांच्या मूळ सेवाज्येष्ठते नुसार ही पदोन्नती देण्यात आली आहे.

राज्यातील २०१ सहाय्यक पोलिस निरीक्षकांच्या पदोन्नतीचे आणि महसूल विभाग वाटपाचे आदेश राज्याचे पोलिस महासंचालक सदानंद दाते यांच्या आदेशानुसार विशेष पोलिस महानिरीक्षक (आस्थापना) सुप्रिया पाटील यादव यांनी ९ एप्रिल रोजी दुपारी काढले आहेत. या २०१ जणांमध्ये अहिल्यानगर जिल्ह्यात कार्यरत असलेले स.पो.नि. प्रल्हाद गिते हे एकमेव आहेत. गिते यांनी २ वर्ष नगर तालुका पोलिस ठाण्याचे प्रभारी म्हणून काम केलेले असून त्यांची नुकतीच राहुरी पोलिस ठाण्यात बदली झाली होती. पदोन्नती आदेशाबरोबरच त्यांना पुणे महसूल विभाग देण्यात आला असून पुणे येथील राज्य गुन्हे अन्वेषण विभागात (सीआयडी) पदस्थापना देण्यात आली आहे.

# संत दादागुरु महाराज यांचे १० एप्रिलला शहरात आगमन

नगर – महान योगी निराहारी संत श्री दादागुरु महाराज यांचे १० एप्रिल ला सकाळी ११ वाजता नगर शहरातील आई तुळजाभवानी कॉलनी, सारसनगर येथे प्रथमच आगमन होत आहे, अशी माहिती गौरव हरबा आणि रूपेश हरबा यांनी दिली.



ते म्हणाले, नर्मदेची पायी परिक्रमा करून दिव्य अनुभूती घेतलेले साहित्यिक मिलिंद चवंडके आणि विनायक लांडे यांच्यामुळे प्रभावित होऊन आमचे पिताश्री भगवान हरबा यांनी नर्मदा परिक्रमा करण्याचा निर्णय घेतला. नर्मदा परिक्रमा करताना निराहारी संत दादा गुरु महाराजांच्या सोबत चालण्याचे भाग्य मिलिंद चवंडके आणि विनायक लांडे यांना लाभले होते. त्यामुळे त्यांनी दादा गुरु महाराजांच्या परिक्रमेत जाण्याचा सल्ला देऊन त्यांच्या व्यवस्थापनाशी भगवान हरबा यांना संपर्क साधून दिला.

दादा गुरु महाराजांच्या दिव्य सान्निध्यात परिक्रमा पूर्ण करण्याचा आनंद घेताना नगरला येण्याची विनंती भगवान हरबा यांनी केली. ती मान्य केल्याने दादा गुरु महाराज नगरला प्रथमच येण्याचे निश्चित झाले. त्यांच्या दर्शनाचा आणि सत्संगाचा महासोहळा आ.संग्राम जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आला आहे. शहरातील नर्मदा भक्तांनी या सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन भगवान हरबा यांनी केले आहे.

# महानगरपालिका पदाधिकारी, अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी १० एप्रिल पासून क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन

**२४ एप्रिलला पारितोषिक वितरण**

नगर – महानगरपालिकेच्या वतीने पदाधिकारी, अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे मनपा कर्मचारी व अधिकाऱ्यांमध्ये एकोपा, स्नेहभाव व उत्साह वाढण्यास मदत होणार असून, विविध स्पर्धांमुळे कौशल्याला वाव मिळणार आहे. या महोत्सवाची सुरुवात १० एप्रिल रोजी माऊली सभागृह येथे होणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमाने होणार असून, हा कार्यक्रम पार पडणार आहे. यामध्ये कर्मचाऱ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळणार असून, विविध सांस्कृतिक सादरीकरणे सादर केली जाणार आहेत.

यानंतर ११ व १२ एप्रिल रोजी अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर क्रिकेट स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धांमध्ये विविध विभागांतील संघ सहभागी होऊन क्रीडा स्पर्धेचा आनंद लुटणार आहेत.

तसेच १८ व १९ एप्रिल रोजी वाडिया पार्क मैदानावर मैदानी व इतर क्रीडा स्पर्धा रंगणार आहेत. यामध्ये जलद चालणे, धावणे, गोळाफेक यांसारख्या मैदानी स्पर्धांसह कॅरम, बुद्धिबळ व बॅडमिंटन अशा विविध स्पर्धांचा समावेश आहे. या स्पर्धांमुळे कर्मचाऱ्यांच्या शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच मानसिक चपळतेलाही चालना मिळणार आहे.

या सर्व स्पर्धांचा समारोप २४ एप्रिल रोजी राजमाता जिजाऊ महापालिका सभागृहात पारितोषिक वितरण समारंभाने होणार असून, विजेत्यांना गौरविण्यात येणार आहे.

मनपा क्रीडा अधिकारी फिलिप्स यांनी या संदर्भात माहिती देताना सांगितले की, या क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमांमुळे कर्मचारी व अधिकाऱ्यांमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण होऊन कार्यक्षमता वाढण्यास मदत होईल. सर्वांनी सहभागी होऊन या उपक्रमाला यशस्वी करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

महाप्रभूजी श्री वल्लभाचार्य यांच्या प्रकट दिनानिमित्त

# नगरमध्ये १२ एप्रिल रोजी रक्तदान शिबीर

नगर – जगद्गुरु महाप्रभूजी श्री वल्लभाचार्य यांच्या ५४९ व्या प्रकट दिनानिमित्त जनकल्याण रक्तकेंद्र नगर च्या वतीने १२ एप्रिल रोजी सकाळी १० ते ३ वाजेपर्यंत नागर महाजनवाडी श्री महाप्रभुजी मार्ग, जुना कापड बाजार, अहिल्यानगर येथे रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले आहे रक्तदान करावे असे आवाहन प्रायोजक वैष्णव नागरिक सहकारी पतसंस्था व अध्यक्ष तथा कार्यकारी मंडळ, विसानागर वडनागरा महाजनवाडी ट्रस्ट वल्लभाचार्य उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# डी. के. डेव्हलपर्सला ग्राहक मंचाचा दिलासा

### भुजबळ दांपत्याची तक्रार फेटाळली

नगर – सदनिका व्यवहारासंदर्भात दाखल करण्यात आलेली तक्रार अहिल्यानगर जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने फेटाळून लावली असून, डी. के. डेव्हलपर्स व संबंधितांना दिलासा मिळाला आहे.

संजय अर्जुन भुजबळ व रेखा संजय भुजबळ (रा. शेडगाव, ता. श्रीगोंदा) यांनी डी. के. डेव्हलपर्स (हनुमाननगर, मचे हॉस्पिटल समोर, ता. श्रीगोंदा) तसेच मे. काळे बी. जे. इंजिनिअर्स अँण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, प्रोप्रा. भास्कर जयवंत काळे व इतर यांच्या विरोधात २०२० मध्ये अहिल्यानगर जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाकडे तक्रार दाखल केली होती. तक्रारदार हे स्लायडिंग विंडोची कामे करतात. डी. के. डेव्हलपर्स यांच्या सदनिकांच्या विंडोची कामेही तक्रारदार भुजबळ यांनीच केली होती. या कामाच्या बिलातून रक्कम वजावट करुन त्यातून सदनिका खरेदी करण्याचा तोंडी व्यवहार दोघांमध्ये झाला होता. या व्यवहारापोटी काही पैसे तक्रारदारांनी भरले होते तर काही त्यांच्या कामाच्या बिलातून वजावट करुन घेतले होते. मात्र, तरीही ठरलेल्या व्यवहारानुसार तक्रारदार यांनी पूर्ण रक्कम दिली नाही. त्यामुळे डी. के. डेव्हलपर्स व त्यांचे भागीदार मे. काळे बी. जे. इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स यांनी भुजबळ यांना खरेदीखत करुन दिले नाही. त्यामुळे भुजबळ यांनी ग्राहक मंचात तक्रार दाखल केली होती. मात्र, प्रतिवादींकडून ॲड. व्ही. एम. भापकर यांनी मांडलेल्या युक्तीवादात ही तक्रार निरर्थक असून ती ग्राहक मंचाच्या कार्यकक्षेत बसत नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. तसेच तक्रारदार व प्रतिवादी यांच्यात ग्राहक व सेवा पुरवठादार असा कोणताही संबंध नसल्याचेही नमूद करण्यात आले. याशिवाय, कोणतीही दूषित सेवा दिलेली नसल्यामुळे तक्रार चुकीची असल्याचा मुद्दा मांडण्यात आला. या प्रकरणाची सुनावणी आयोगाच्या अध्यक्षा प्रज्ञा हेन्द्रे व सदस्या चारु विनोद डोंगरे यांच्या समोर झाली. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद व सादर करण्यात आलेल्या पुराव्यांचा सखोल विचार केल्यानंतर आयोगाने तक्रारदारांची तक्रार फेटाळून लावली.

# १६ वर्षीय मुलीचे अपहरण करणाऱ्या आरोपीला पोलिसांनी ठोकल्या बेड्या

**सुमारे २ महिने पोलिसांना दिला गुंगारा, अखेर श्रीरामपूर शहरात लागला हाती**

नगर – शहरातील कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीतून अपहरण झालेल्या १६ वर्षीय अल्पवयीन मुलीचा शोध घेण्यात पोलिसांना यश आले आहे. 'ऑपरेशन मुस्कान' अंतर्गत ही कारवाई करण्यात आली असून, या प्रकरणातील संशयित आरोपीला श्रीरामपूर येथून अटक करण्यात आली आहे.

कोतवाली पोलीस ठाणे हद्दीतील १६ वर्षीय अल्पवयीन मुलगी ९ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजेच्या सुमारास बेपत्ता झाली होती. संशयित आरोपी प्रकाश सावंत (रा. बोल्हेगाव एमआयडीसी, अहिल्यानगर) याने या मुलीचे अपहरण केल्याची तक्रार मुलीच्या पालकांनी दिली होती. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १३७(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यापासून पोलीस संशयित आरोपी आणि मुलीचा शोध घेत होते, मात्र ते वारंवार जागा बदलत असल्याने मिळून येत नव्हते. दरम्यान,कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की,सदर आरोपी आणि मुलगी श्रीरामपूर शहरात वास्तव्यास आहेत.

मिळालेल्या माहितीची खातरजमा करून पो. नि. गायकवाड यांनी तातडीने तपासी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक प्रवीण पाटील यांच्या नेतृत्वाखाली एक पथक तयार केले. पोलिसांचे पथक तात्काळ श्रीरामपूर येथे रवाना झाले. तेथे श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मदतीने बारकाईने तपास करण्यात आला. अत्यंत गुप्ततेने राबवलेल्या या मोहिमेत पोलिसांनी आरोपी प्रकाश सावंत याला ताब्यात घेतले आणि अल्पवयीन मुलीची सुटका केली. आरोपीला कोतवाली पोलीस ठाण्यात आणून रीतसर अटक करण्यात आली आहे.

ही कारवाई पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक प्रवीण पाटील, पोलिस अंमलदार रोहिणी दरंदले, याकूब सय्यद, अमोल गाडे, संदीप शेंडगे आणि दक्षिण मोबाईल सेलचे राहुल गुंडू यांनी केली आहे. सदर प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रवीण पाटील हे करीत आहेत.

# राहुरीत भाजप-राष्ट्रवादी-वंचितमध्ये विधानसभेची लढत, अक्षय कर्डिले, गोविंदराव मोकाटे, संतोष चोळके रिंगणात

**७ उमेदवार आखाड्यात; १६ जणांनी घेतली माघार**

राहुरी – राहुरी-पाथर्डी-नगर विधानसभा पोटनिवडणुकीच्या आखाड्यात आता केवळ ७ उमेदवार उरले असून, भाजपाचे अक्षय कर्डिले, राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे गोविंदराव मोकाटे, वंचित बहुजन आघाडीचे संतोष चोळके यांच्यासह चार अपक्ष उमेदवार निवडणुकीच्या आखाड्यात उरले आहेत.

९ एप्रिल रोजी अर्ज माघारीचा शेवटचा दिवस होता. त्यामुळे अर्ज माघारीनंतर आता राहुरी मतदारसंघात भाजप, राष्ट्रवादी-वंचितसह अपक्षांमध्ये लढत रंगणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. या पोटनिवडणुकीसाठी सुरुवातीला एकूण ३० उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी छाननी प्रक्रियेत ७ अर्ज अवैध ठरले, तर २३ उमेदवारी अर्ज वैध ठरले होते. त्यानंतर ७ व ८ एप्रिल या दोन दिवसांत काही उमेदवारांनी स्वेच्छेने माघार घेतली. यामध्ये प्रतिमा किशोर देसर्डा, कोळसे बाळू बापूराव, बिलाल गफुरभाई शेख, सुदर्शन लक्ष्मण शितोळे, अल्ताफ इब्राहिम शेख, सखाहरी शांताराम बर्डे आणि इम्रान नबी देशमुख यांनी आपली उमेदवारी मागे घेतली आहे.

तसेच ९ एप्रिल हा अंतिम दिवस असल्याने शेवटच्या क्षणापर्यंत राजकीय घडामोडींना वेग आला होता. शेवटच्या टप्प्यात उर्वरित ९ जणांनी माघार घेतली. या माघारीनंतर निवडणूक आखाड्यात ७ उमेदवार उरले आहेत. यामध्ये भाजपचे अक्षय कर्डिले, राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे गोविंदराव मोकाटे, वंचित बहुजन आघाडीचे संतोष चोळके यांच्यासह अपक्ष उमेदवार रावसाहेब खेवरे, सूर्यभान लांबे, महेश हापसे, अथर्व म्हसे या उमेदवारांचा समावेश आहे.


**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अहिल्यानगर यांचे कार्यालय**

**- जाहिर नोटीस -**

**पंडीत दीनदयाळ नागरी सहकारी पतसंस्था मर्या. आनंदी बाजार, अहिल्यानगर** या संस्थेने कर्जदारांच्या थकबाकीपोटी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील कलम १०१ अन्वये मिळविलेल्या वसुली प्रमाणपत्राचे आधारे कार्यवाही केल्यानंतर जप्त केलेल्या मालमत्तेचे अपसेट प्राईज मिळणेबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाकडे दाखल केलेले असून त्या अनुषंगाने संस्थेचे कर्जदार/जामीनदार यांना सुनावणी नोटीस रजिस्टर पोस्टाने पाठविण्यात आल्या होत्या व या कार्यालयामध्ये दिनांक २३/३/२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आलेली असून सुनावणीचे सुनावणी नोटीस लागू झाल्याबाबत पोहच पावत्या अगर नोटीसा प्राप्त न झाल्याने त्यांना जाहिर सुनावणी देण्याचा निर्णय घेण्यात आला. संस्थेचे खालील कर्जदार/जामीनदार गैरहजर राहिलेले असून संस्थेने लिलाव केलेल्या मालमत्तेचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. नं. | कर्जदाराचे नांव | गांव/पत्ता | कर्जाच्या अनुषांगाने लिलाव केलेल्या मालमत्ता धारकाचे नांव | गांव/पत्ता | मिळकतीचे वर्णन स.नं./गट नं. | मिळकतीचे वर्णन क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | **श्री. महेश सुमतीलाल संचेती** | **प्लॉट नं. ३, नवकार, विनायक नगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर** | **श्री. महेश सुमतीलाल संचेती** | **अरणगांव, ता. अहिल्यानगर** | **४५२/१/४५२/२ प्लॉट नं. २४** | **५.७२.१३ आर चौ.मि.** |

तेव्हा या जाहिर नोटीस अन्वये सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, सदर प्रकरणी म्हणणे मांडण्यासाठी त्यांनी **दिनांक २०/४/२०२६ रोजी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहिल्यानगर, सहकार महर्षी गोपाळरावजी सोले पाटील सहकार प्रशिक्षण केंद्र, चाहुराणा बु।।, अहिल्यानगर यांचे दालनात दुपारी ठिक १२ वाजता** समक्ष हजर रहावे. आपण सदर दिवशी हजर न राहिल्यास अथवा आपले लेखी/तोंडी म्हणणे सादर न केल्यास आपले काही एक म्हणणे नाही असे गृहीत धरुन मालमत्तेचे मुल्यांकन ठरवून देण्याची (अपसेट प्राईज विक्रीची) पुढील कारवाई करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**मंगेश सुरवसे**
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अहिल्यानगर


# कॉलेजमधील वादातून तरुणावर कोयता व वस्तऱ्याने जीवघेणा हल्ला

नगर – शहरातील प्रेमदान हाडको भागातील एका सलून दुकानात केस कापण्यासाठी गेलेल्या तरुणावर जुन्या वादातून चौघांनी कोयता आणि वस्तऱ्याने जीवघेणा हल्ला केल्याची घटना ७ एप्रिल रोजी रात्री १०.४५ च्या सुमारास घडली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत यश मनोज कांडेकर (वय २१, रा. गणेश चौक, सिव्हील हडको) याने फिर्याद दिली आहे. फिर्यादी यश हा आपल्या मित्रासह घोणसे क्लासजवळील बंटी सलूनमध्ये बसलेला असताना ही घटना घडली. आरोपी अमोल पाडळे, तुषार भोसले, नयन तांदळे आणि अक्षय पवार हे दुचाकीवरून त्या ठिकाणी आले. आमच्या भागात हवा करायची नाही, नीट राहायचे असेल तर पैसे द्यावे लागतील, असे म्हणत आरोपींनी यशला बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. यावेळी आरोपींनी फिर्यादीच्या गळ्यातील सोन्याची साखळी जबरदस्तीने तोडून घेतली. अमोल पाडळे आणि तुषार भोसले यांनी हातातील कोयत्याने यशच्या छातीवर व पाठीवर वार केले, तर नयन तांदळे याने सलूनमधील वस्तऱ्याने त्याच्या डोक्यावर आणि हातावर गंभीर इजा केली. हल्ल्यानंतर आरोपींनी परिसरात कोयता नाचवून दहशत निर्माण केली आणि पळ काढला. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण असून, जखमी तरुणावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तोफखाना पोलिसांनी या गंभीर घटनेची नोंद घेत गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर करत आहेत.

